REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ पुणें, बुधवार, तारीख १० एप्रिल, १९४० अंक १५

'अर्थ' ग्रन्थमाला

## बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति तयार झाली.

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—( १ ) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
( २ ) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### रहाणीचें वाढतें मान

जून, १९३४ अखेर संपलेल्या वर्षांतील मुंबई शहरामधील कामगारांच्या रहाणीच्या खर्चाचें मान १०० धरल्यास १५ मार्च अखेर संपलेल्या महिन्यांतील तें मान ११० होतें. खाद्य पदार्थांच्या किंमतींचें मान १२१ भरलें.

### औषधांत साखर घालूं नका

औषधांत साखर घालतात, ती औषधाचा कडवटपणा दूर करण्यासाठीं होय. डॉक्टरांनीं आपल्या औषधांत शक्य तितकें सायरप कमी घालावें आणि जरूर तेथें ग्लिसरीनचा अगर सॅकरीनचा उपयोग करावा, अशा अर्थाचीं विनंतिपत्रें ग्रेटब्रिटनमधील फार्मास्युटिकल सोसायटीनें सर्व डॉक्टरांस पाठवावीं, अशी सूचना सोसायटीस तेथील सरकारी साखर-नियंत्रकानें केली आहे.

### पार्लमेंटची मुदत वाढणार

ब्रिटिश पार्लमेंटची मुदत नोव्हेंबर, १९४० अखेर संपते, ती वाढविणारें बिल ब्रिटिश सरकारास लवकरच आणावें लागेल. सध्याच्या परिस्थितींत सर्वसाधारण निवडणुकीची दंगल कोणास नको आहे.

### मोटारींबाबत नवीन नियम

मोटार वेहिकल्स ॲक्टान्वयें मुंबई सरकारनें केलेले नियम १ एप्रिल रोजीं अंमलांत येण्यास प्रारंभ झाला.

### रक्ताची बँक

शिकॅगो येथील कुक कौन्टी इस्पितळांत "रक्ताची बँक" उघडण्यांत आली आहे. कोणासहि त्याच्या शस्त्रक्रियेचे वेळीं रक्त काढून अगर इतर वेळीं मुद्दाम रक्त काढूनहि तें वरील इस्पितळांत "ठेव" म्हणून ठेवितां येतें. त्याबद्दल त्यास पावती आणि रक्ताचें वर्णन लिहिलेला कागद हीं दिलीं जातात. त्यास अपघातांत अगर इतर कारणानें रक्ताची आवश्यकता भासली, तर तें त्या इस्पितळांतून मिळूं शकतें. रक्तांतरासाठी रक्त देणाऱ्या व्यक्तींची वाट पहाण्याचें कारण उरत नाहीं.

### ग्रेट ब्रिटनमधील ग्रन्थालयें

ग्रेट ब्रिटनमधील ग्रन्थालयांचें काम, युद्ध-परिस्थितींतहि, पूर्ववत् चालू आहे. गेल्या महायुद्धाचे वेळीपेक्षां आतां ग्रंथालयांची परिस्थिति पुष्कळच सुधारली आहे, त्यामुळें त्यांच्या कामांतील अडथळ्यास तोंड देण्यास त्या समर्थ झाल्या आहेत. हिटलरचें आत्मचरित्र आणि जर्मनीविषयीं माहिती देणारे इतर ग्रंथ ह्यांस सध्या विशेष मागणी आहे.

### सर्व लोखंडी दरवाजे सरकार-स्वाधीन

प्रार्थना मंदिरांचे लोखंडी दरवाजे व पोपच्या मालकीचे, कलात्मक अगर ऐतिहासिक महत्वाचे आणि परकीयांच्या मालकीचे लोखंडी दरवाजे हे वगळून बाकी सर्व लोखंडी दरवाजे काढून ते सरकारास विकले पाहिजेत, अशी सक्ती इटलीमध्यें करण्यांत आली आहे. त्यांची किंमत सरकारच ठरविणार आहे.

### नियंत्रणाचा उद्देश

जवस, एरंडी इत्यादींचे निर्गतीवर हिंदुस्थान सरकारनें नियंत्रण घातलें आहे, त्याचा उद्देश दोस्त राष्ट्रांस त्यांचा पुरवठा नीट व्हावा असा आहे. त्यांची मागणी हिंदी पुरवठ्यापेक्षा मोठी आहे. किंमती खालीं आणणें हा वस्तुत नियंत्रणाचा उद्देश नाहीं, असें हिंदुस्थान सरकारनें जाहीर केलें आहे.

### भाषा

रशियामध्यें ११४ भाषा चालू आहेत. ब्रिटिश साम्राज्यांत चालू असलेल्या भाषांची संख्या ह्यापेक्षा कितीतरी पट अधिक आहे. एकट्या हिंदुस्थानांतच २०० वर भाषा आहेत.

### दररोज २० फूट लांब दाढी

प्रत्येक मनुष्याच्या चेहऱ्यावर सुमारें १२,५८० केस असतात आणि त्यांच्या रोजच्या वाढीची एकूण लांबी २० फूट भरते, असा एकानें अंदाज केला आहे.

### ट्रेझरी बिलांवर १ रु. १० आ. ७ पै व्याज

हिंदी रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं १ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर दर सा. द. शें. १ रु. १० आ. ७ पै इतका पडला.

### संशोधन बोर्डाचें काम कोणतें ?

बोर्ड ऑफ इंडस्ट्रिअल ॲन्ड सायंटिफिक रिसर्च ह्या संस्थेच्या कार्याची रूपरेषा बोर्डाचे अध्यक्ष, सर ए. रामस्वामी मुदलियार, ह्यांनीं बोर्डाच्या पहिल्या सभेंत समजावून सांगितली. संशोधनाच्या विशिष्ट योजनांबाबत सरकारास सल्ला देणें, कांहीं विशिष्ट धंद्यांसंबंधीं संशोधन करणाऱ्या संस्थांस सहाय देणें आणि संशोधनासाठीं शिष्यवृत्त्यांबाबत सरकारास सूचना करणें, हीं बोर्डाचीं प्रमुख कामें आहेत.

### ब्रिटिश कर्जरोख्यांवरील व्याजाची वसुली

ब्रिटिश कर्जरोखे धारण करणाऱ्या हिंदी लोकांच्या व्याजाची वसुली सुलभ व्हावी, म्हणून रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ही बँक ऑफ इंग्लंडच्या एजंटाचें काम करणार आहे. शेड्यूल्ड बँका व रिझर्व्ह बँकेनें मान्यता दिलेले दलाल ह्यांच्या मार्फत ती काम स्वीकारील. पौंडांतील रकमेचें १ शि. ६ पे. ह्या दरानें रुपयांत रूपांतर करून दर शेकडा २ आणे कमिशन बँक आकारील. किमान कमिशन ४ आणे आहे.

### कॉलऱ्याची लस

कॉलऱ्याचें इनॉक्युलेशन करण्यासाठीं लागणारी बाजारांत मिळणारी लस कित्येक प्रसंगीं वापरण्यास अयोग्य असते, असा निष्कर्ष कसोली येथील सेंट्रल रिसर्च इन्स्टिट्यूटमधील प्रयोगांवरून निघतो. ही लस टोचणारांनीं आपल्या जवळील लशीचे नमुने वरचेवर तपासून घेणें इष्ट आहे.

### युद्धाच्या बातम्या व अमेरिका

युरोपांत चाललेल्या युद्धाविषयींच्या बातम्या मिळविण्याची इच्छा अमेरिकेंत इतकी प्रबळ आहे कीं, अमेरिकन वृत्तपत्रांचे ८०० प्रतिनिधी युरोपांत वावरत आहेत आणि ते दर महिन्यास १० लक्ष शब्द तारेनें वर्तमानपत्रांस पाठवितात.

### धर्मादायाची मदत बरोबर मागण्याविषयी कायदा

पोलिसांचा परवाना असल्यावांचून बरोबर हिंडून धर्मादायाची मदत मागणें हा गुन्हा ठरवणारा एक कायदा इंग्लंडमध्यें अंमलांत आला आहे. सार्वजनिक कार्याच्या नांवावर पैसा जमा करून त्याचा दुरुपयोग करणारांचें नियंत्रण करणें हा ह्या कायद्याचा हेतु आहे.

### कोयनेल म्हणून खडूची विक्री

पंजाबांतील मलेरियापीडित एका जिल्ह्यांत कोयनेलच्या गोळ्या म्हणून खडू विकत असल्याचें आढळलें, असें मि. जे. डब्ल्यू. बॉईल ह्यांनीं असेंब्लींतील आपल्या एका भाषणांत सांगितलें.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | १७० |
| २ हिंदी व्यापाऱ्यांचीं गाऱ्हाणीं व मागण्या ... | १७१ |
| ३ रिझर्व्ह बँकेचें साप्ताहिक पत्रक ... ... | १७२ |
| ४ सोन्याचें जागतिक उत्पादन ... ... | १७२ |
| ५ स्फुट विचार ... जमीन गहाणाच्या बँकांची परिषद्–मद्रास प्रांतांतील बँकांच्या प्रतिनिधींची परिषद्–वेस्टर्न इंडिया विमा कंपनीची प्रगति–व्यापार वाढविण्यासाठीं नवीन कंपनी | १७३ |
| ६ पॉवर अल्कोहोलचें उत्पादन ... ... | १७४ |
| ७ युद्धाचे आर्थिक परिणाम | १७४ |
| ८ वल्टर्न इंडिया विमा कं. लि. | १७५ |
| ९ ऑल इंडिया मुस्लिम चेंबर ... ... | १७६ |
| १० जपानचा प्रमुख निर्गत व्यापार ... ... | १७७ |
| ११ पार्लमेंटचे सतत ५० वर्षें सभासद ... ... | १७७ |
| १२ शेतीच्या मालाच्या उठावास सहाय ... | १७८ |
| १३ अमेरिकेची औद्योगिक प्रगति ... ... | १७८ |
| १४ निवडक बाजारभाव | १७९ |

अर्थ

बुधवार, ता. १० एप्रिल, १९४०

## हिंदी व्यापाऱ्यांचीं गाऱ्हाणीं व मागण्या

प्रचलित आर्थिक प्रश्नांवर हिंदी व्यापारी वर्गाचें अधिकृत मत प्रतिवर्षी व्यक्त होण्याचा प्रसंग म्हटला म्हणजे फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्स ऑफ कॉमर्सची भरणारी वार्षिक सभा हा होय. हिंदुस्थानचा व्यापार व उद्योगधंदे ह्यांचेविषयीं त्यांच्याशीं संबंध असलेल्या संघटित मंडळ्यांचें एकत्र संमेलन व्हावें ही गोष्ट स्वाभाविक आहे आणि इतर देशांत वस्तुःस्थितिहि अशीच असते. परंतु हिंदुस्थानांत धंदा–व्यापार करणारे हिंदीतर लोक आहेत. त्यांच्या मंडळ्यांचें संघटन निराळें आहे आणि हिंदी व्यापाऱ्यांस स्वतंत्ररीतीनें आपली ह्या बाबतींतली व्यवस्था करावी लागली आहे. हिंदी आणि हिंदीतर व्यापारी ह्यांची विविध प्रश्नांकडे पहाण्याची दृष्टि भिन्नभिन्न असल्याचें आढळून आल्याकारणानें ही दुहेरी योजना झालेली आहे. सरकारच्या औद्योगिक धोरणाचे संबंधानें दोन निरनिराळीं मतें प्रदर्शित होणें हें हिंदुस्थानच्या व्यापाराच्या दौर्बल्याचें लक्षण आहे. युरोपियन व्यापारी मंडळ्यांचा दृष्टिकोन राष्ट्रीय नसल्याकारणानें हिंदी व्यापाऱ्यांनीं आपली निराळी प्रातिनिधिक संस्था काढून स्वतंत्रपणानें आपल्या स्वतःच्या ध्येयास अनुसरून कार्य चालवलें आहे हें प्रगतीचें, स्वावलंबनाचें व वाढत्या शक्तीच्या सामर्थ्याचें सुचिन्ह आहे असेंहि म्हणतां येईल आणि हीच कल्पना वस्तुस्थितीस धरून आहे. हिंदी लोकमत हिंदी संघटनानें जसें प्रभावी होतें, तसें तें एरव्हीं होऊं शकत नाहीं असा अनुभव आहे. मध्यवर्ती कायदेमंडळांतहि हिंदी प्रतिनिधींचें आर्थिक प्रश्नासंबंधांतलें मत आणि त्यांतील युरोपिअन गटाचें मत ह्यांत वारंवार ठळक भेद दिसून येतो. हिंदी व्यापारी मंडळें प्रांताप्रांतांत आहेत, त्यांचे प्रतिनिधी एकत्र येऊन त्यांनीं एकमतानें विशिष्ट धोरण आखावें व कार्यक्रम निश्चित करावा ही गोष्ट सरकारासहि इष्टच वाटली पाहिजे.

गेल्या महिन्याच्या ३० व ३१ ह्या तारखांस दिल्ली येथें हिंदी व्यापारी मंडळांच्या अखिल भारतीय संघाची सभा भरली होती, तीमध्यें मंजूर झालेल्या ठरावांवरून ह्या देशाचे उद्योगधंदे व व्यापार ह्यांच्या सद्यःपरिस्थितीविषयीं जबाबदार असें हिंदी लोकमत काय आहे हें स्पष्ट होत आहे. देशाच्या आर्थिक उन्नतीचा त्याच्या राजकीय परिस्थितीशीं किती निकट संबंध आहे हें वरील सभेच्या अध्यक्षांनीं निर्दिष्ट केलें. राजकीय शांतता व समाधान ह्यांचेवांचून उद्योगधंदे व व्यापार ह्यांस सुस्थिति प्राप्त होऊं शकत नाहीं असें सांगून हिंदुस्थानच्या राजकीय भवितव्याविषयीं ब्रिटिश सरकारानें निश्चित असें धोरण प्रकट करणें अगत्याचें होतें असें आपलें मत त्यांनीं दिलें. प्रस्तुत युद्धपरिस्थितीचा योग्य उपयोग करून घेतल्यास हिंदी उद्योगधंद्यांचें स्थान बळकट करतां येईल असें दि. ब. रत्नसभापति मुदलियार ह्यांनीं सरकारास सुचविलें. कामकरी वर्गास उद्देशून ते म्हणाले, कीं पगारवाढीच्या त्यांच्या मागण्या हिंदी उद्योगधंद्यांस जाचक होतील व त्यांची प्रगति खुंटवण्यास कारणीभूत होतील अशा प्रकारच्या असूं नयेत. हिंदुस्थानाच्या कच्च्या मालाच्या किंमतीचें नियंत्रण हिंदी शेतकरीवर्गाच्या हितास बाधक होईल असें असूं नये असें सांगून स्वदेशी धंद्यांस संरक्षण मिळण्याची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादिली.

दिल्ली येथील सभेंत अनेक ठराव मंजूर झाले, त्यांत जादा नफ्यावरील कराच्या निषेधाचा ठराव अध्यक्षांनींच पुढें मांडला. ह्या विषयाची इतकी चर्चा झालेली आहे आणि त्याचे संबंधांत हिंदी लोकमत इतक्या स्पष्ट रीतीनें व्यक्त झालें आहे कीं, त्यावर सभेंत भाषणें होण्याची आवश्यकता अर्थातच भासली नाहीं. हिंदी शेतकऱ्यास चार पैसे मिळण्याची संधि प्रस्तुत युद्धानें आणून दिलेली असतां किंमतींचें नियंत्रण करून सरकारनें ती वायां जाऊं देऊं नये अशा आशयाचा ठरावहि सभेंत मंजूर झाला. व्यापारी जहाजांच्या धंद्यास सरकारनें सहाय देण्याच्या आवश्यकतेविषयीं एक महत्त्वाचा ठराव सभेनें पास केला. ह्या विषयाचीहि चर्चा आज अनेक वर्षें चालली आहे. हिंदुस्थानच्या व्यापारांत हिंदी मालकीच्या जहाजांच्या मंडळ्यांचें प्राधान्य असावें हें वास्तविक उचित आहे, पण परिस्थिति मात्र त्याच्या उलट आहे. शिंदा कंपनीनें आगबोटी बांधण्याची एक योजना आखली आहे तिला सरकारनें सहाय द्यावें अशी विनंति सभेनें केली आहे. जहाजांच्या वहातुकीचा व तीं बांधण्याचा हे दोन्ही धंदे राष्ट्रास फार मोठ्या महत्त्वाचे असून हिंदुस्थान देशास त्यांमध्यें कांहींच स्थान नाहीं ही लाजिरवाणी गोष्ट आहे. ही असहायतेची स्थिति दूर झाली पाहिजे हें निर्विवाद आहे. स्वदेशी उद्योगधंद्यांस संरक्षण देण्याचें सरकारचें आजचें धोरण अपुरें व असमाधानकारक आहे आणि त्यांत देशी धंद्यांची वाढ झपाट्यानें होण्याचे दृष्टीनें सुधारणा होणें आवश्यक आहे ह्या अर्थाच्याहि एका ठरावास सभेनें मान्यता दिली. सध्या आपल्या इच्छेप्रमाणें जरूर वाटेल तेव्हां सरकार टारिफ बोर्डाची नेमणूक करतें. त्याच्याऐवजी एक कायमचें बोर्ड स्थापन व्हावें आणि त्याच्याकडे देशी उद्योगधंद्यांच्या गरजांकडे सतत लक्ष देण्याचें काम सोंपवलें जावें अशी सूचना करण्यांत आली आहे. औद्योगिक संरक्षणाचें धोरणहि अधिक धडाडीचें व सढळ हाताचें असलें पाहिजे असें मतहि व्यक्त करण्यांत आलें. फिस्कल कमिशननें १९२२ सालीं केलेल्या शिफारशी बदललेल्या परिस्थितींत जाचक वाटतात, तेव्हां त्यांचा फेरविचार व्हावा असें सभेंत सांगण्यांत आलें. संरक्षण मागणाऱ्या धंद्यांनीं ज्या विशिष्ट अटींसंबंधानें समाधान करावें लागतें, त्या निष्कारण प्रतिबंधक असल्यानें त्या सैल केल्या जाव्या असें वक्त्यांनीं स्पष्ट करून सांगितलें. बाहेरच्या देशांत हिंदी बँकांस योग्य हक्क व सवलती देण्यांत येत नाहींत, त्याबाबत सभेनें असमाधान प्रकट केलें. हिंदी व्यापाऱ्यांच्या प्रतिनिधींनीं चर्चिलेले हे सर्व प्रश्न किती महत्त्वाचे आहेत आणि त्यांचा समाधानकारक निकाल लावला जाणें राष्ट्राच्या प्रगतीच्या व स्वास्थ्याच्या दृष्टीनें किती अगत्याचें आहे हें आणखी विशद करून सांगण्याची आवश्यकता नाहीं.

## रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचें साप्ताहिक पत्रक

(२९ मार्च, १९४०)

### बँकिंगचा विभाग

| देणें | रु. |
|---|---|
| भांडवल भरलेलें | ५,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ५,००,००,००० |
| ठेवी:— | |
| (अ) सरकारी | |
| मध्यवर्ती सरकारच्या | ८,२२,२९,००० |
| ब्रह्मदेश सरकारच्या | ३,४७,०६,००० |
| इतर सरकारी खातीं | १०,५५,६७,००० |
| (ब) बँकांच्या | १७,५९,३५,००० |
| (क) इतर | ९७,४९,००० |
| बिलें धावयाचीं | ८,८३,००० |
| इतर देणी | १,४७,४६,००० |
| एकूण रु. | ५२,३८,२५,००० |

| येणें | रु. |
|---|---|
| नोटाः— | |
| (अ) हिंदुस्थानांत चालणाऱ्या | १३,३३,२८,००० |
| (ब) ब्रह्मदेशांत चालणाऱ्या | ३२,९४,००० |
| रुपये (नाणें) | ६,४७,००० |
| चिल्लर (नाणें) | ४,२७,००० |
| विकत घेतलेल्या आणि डिस्कौंट | |
| केलेल्या हुंड्या | |
| (अ) अंतर्गत | ......... |
| (ब) बाहेरच्या | ......... |
| (क) हिं. सरकारचीं ट्रेझरी बिलें | १,१९,८४,००० |
| परदेशांत ठेवी | २८,४९,१२,००० |
| सरकारांस कर्जें व ॲडव्हान्स | ......... |
| इतर कर्जें व ॲडव्हान्स | १८,३०,००० |
| कर्जरोख्यांत गुंतविलेला पैसा | ७,७६,३३,००० |
| इतर येणें | ९७,७०,००० |
| एकूण रु. | ५२,३८,२५,००० |

### नोटांचा विभाग

| देणें | रु. |
|---|---|
| नोटा (अ) बँकिंग विभागांतील<br>१३,३३,२९,००० रु.<br>(ब) व्यवहारांत गेलेल्या हिंदुस्थानांत आणि ब्रह्मदेशांत मिळून<br>२३८,५५,०१,००० रु. | |
| एकूण देणें | २,५२,२१,२३,००० |

| येणें | रु. |
|---|---|
| (अ) सोनें, नाणीं व पाटले<br>हिंदुस्थानांत<br>४१,५४,४८,००० रु.<br>हिंदुस्थानाबाहेर<br>२,८६,९८,००० रु.<br>पौंडांतले (स्टर्लिंग रोखे)<br>१,१३,५०,११,०००, रु. | |
| (अ) ची बेरीज | १५७,९१,५७,००० |
| (ब) रुपये | ५५,९४,२५,००० |
| हिंदुस्थान सरकारचे रोखे | ३८,३५,४१,००० |
| हिंदुस्थानांतल्या हुंड्या व इतर पत पत्रिका | ......... |
| एकूण येणें | २,५२,२१,२३,००० |

### सोन्याचें जागतिक उत्पादन

सोन्याचें जागतिक उत्पादन वाढत आहे आणि त्याचा मोठा भाग अमेरिकेकडे जात आहे. खालील तक्त्यांत सोन्याच्या उत्पादनाचे तुलनात्मक आकडे दिले आहेत:—

| | फाइन औंस (हजार) | |
|---|---|---|
| | १९३८ | १९३९ |
| दक्षिण आफ्रिका | १२,१६० | १२,८२० |
| रशिया | ५,००० | ५,००० |
| कॅनडा | ४,७२५ | ५,०४६ |
| अमेरिका | ४,२४५ | ४,५६५ |
| ऑस्ट्रेलिया | १,५९० | १,६३० |
| इतर देश | ९,३०० | १०,०८९ |
| एकूण | ३७,०२० | ३९,१५० |

१९२९ सालीं १ कोटि, ९६ लक्ष औंस सोन्याचें उत्पादन झालें होतें; म्हणजे गेल्या १० वर्षांत तें दुप्पट झालें आहे. ह्या सोन्याची किंमत अर्थातच चलनांत मोजली जाते. ही किंमत डॉलरमध्यें २३८% आणि ब्रिटिश पौंडांत ३००% वाढली आहे. अमेरिकेच्या तिजोरींतील सुवर्णसंचय गेल्या वर्षी ८ कोटि ९० लक्ष औंसांनीं वाढून तो ५० कोटि, २४ लक्ष औंस झाला.

### ह्या स्त्रियांस पोटगी मागतां येईल काय ?

ग्रेट ब्रिटनमधील सर्व प्रमुख औद्योगिक शहरांतील स्त्रिया आणि मुलें ह्यांचें 'बिनधोक' ठिकाणीं स्थलांतर करण्यांत आलें आहे. मागें शहरांत राहिलेल्या पुरुषांपैकीं कांहींनीं आपल्या पत्नींना पैसे पाठविण्याचें बंद केलें आहे. "त्यांच्या जाण्यास आमची संमति नव्हती; निदान त्यावेळीं संमति असली तरी आतां ती नाहीं; तेव्हां त्यांनीं परत यावें," अशी ह्या पुरुषांची भूमिका आहे. परस्थळीं रहावयास गेलेल्या ह्या स्त्रियांची त्यामुळें गैरसोय झाली आहे. पतीनें जाणून बुजून पत्नीच्या पोटापाण्याची योग्य ती तजवीज केली नाहीं तर विवाहित स्त्रीस कोर्टाकडे पोटगी मागतां येते, परंतु वरील युद्धविषयक परिस्थितींत जाणून बुजून पतीनें पत्नीची आबाळ केली, असा अर्थ निघतो काय ? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. पत्नी आणि मुलें घरीं परत आल्यास पती त्यांचा सांभाळ करण्यास तयार आहेत. हायकोर्टांत ह्याचा निकाल होईपर्यंत हा प्रश्न नीट सुटणार नाहीं.

# स्फुट विचार

### जमीन गहाणाच्या बँकांची परिषद

जमीन गहाणाच्या बँकांच्या प्रतिनिधींची पहिली परिषद मुंबई येथें विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल हॉलमध्यें गेल्या शनिवारीं व रविवारीं भरली होती. सर गोविंदराव प्रधान ह्यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत जमीन गहाणाच्या बँकांचा इतिहास त्यांच्या स्थापनेपासून थोडक्यांत निवेदन केला. प्राथमिक बँकांची संख्या आतां १५ असून त्यांचें एकूण भाग भांडवल सुमारें २३/४ लक्ष रुपये आहे आणि त्यांच्या सभासदांची संख्या ४० हजार आहे. प्रांतिक बँकेनें २० लक्ष रुपयांचीं डिबेंचर्स विकलीं आहेत आणि आतां तिला आणखी पैसा तातडीनें हवा आहे. सर गोविंदराव ह्यांनीं ह्या कामीं मदत देण्याची सरकारास विनंति केली आणि परिषदेनेंहि तीस दुजोरा देणारा ठराव मंजूर केला व जमीन गहाणाच्या बँकांच्या व्यवहाराचे कार्यांत येणाऱ्या अडचणींची तिनें चर्चा केली. शेतकऱ्यांच्या ऋणमुक्ततेचा कायदा प्रांतिक विधिमंडळानें केला आहे, त्याची अंमलबजावणी चालू होईल, तिच्या दृष्टीनें उद्भवण्याच्या बाबींचाहि विचार होऊन कित्येक सूचना सरकारास करण्यांत आल्या. प्रत्येक प्राथमिक बँकेंत लँड व्हॅल्युएशन ऑफिसर असतो त्याची नेमणूक व पगार ह्या संबंधांतली विशिष्ट व्यवस्था परिषदेनें मान्य केली आणि रजिस्ट्रारनें नेमलेल्या अधिकाऱ्यांच्या पगाराचा निम्मा हिस्सा सरकारनें द्यावा असें सुचविलें. ऑडिटबद्दल बँकांस जी फी आज द्यावी लागते, ती बोजड असल्यानें तिचा दर कमी केला जावा असें मत तिनें नमूद केलें. मद्रासमध्यें जमीन गहाणाच्या बँकांचा स्वतंत्र कायदा आहे तशी व्यवस्था ह्या प्रांतांत व्हावी अशीहि सूचना तिनें केली. परिषदेस बहुतेक सर्व प्राथमिक बँकांचे प्रतिनिधि उपस्थित होते आणि रजिस्ट्रार व इतर सहकारी अधिकाऱ्यांनीं चर्चेंत भाग घेतला. प्रो. काळे ह्यांनीं अध्यक्षांचे आभार मानल्यावर परिषदेचें काम संपलें.

### मद्रास प्रांतांतील बँकांच्या प्रतिनिधींची परिषद

मद्रास प्रांतांतील समाईक भांडवलाच्या हिंदी बँकांच्या प्रतिनिधींची एक परिषद नुकतीच भरली होती. ह्या परिषदेनें नियोजित बँकिंगच्या कायद्याची तूर्त आवश्यकता नाहीं, असें आपलें मत नमूद केलें. कंपनी कायद्यामध्यें दुरुस्ती करून बँकांच्या ठेवीदारांचे हितसंबंध सुरक्षित राखण्यांत आले आहेत आणि ह्या दुरुस्तीचा परिणाम अजून दिसूं लागण्यास अवकाश आहे, असें परिषदेचें मत पडलें. नियोजित बँकिंगच्या कायद्यांत बँकांवर किमान वसूल भांडवलाची अट घातलेली आहे, ती योग्य नाहीं; किमान भांडवल आणि बँक जेथें चालविण्यांत येणार, तेथील लोकसंख्या ह्यांचा संबंध जोडणें इष्ट नाहीं आणि एकूण ठेवींच्या ६१/४% पेक्षा बँकेचें भांडवल व रिझर्व्ह कमी असूं नयेत, असा नियम केल्यास तो पुरेसा होईल असा परिषदेनें ठराव केला. वर्षानी प्रॉमिसरी नोटांऐवजी दर्शनी हुंड्यांचा उपयोग वाढेल असा प्रचार बँकांनीं करावा, स्थावर इस्टेटीवर कर्ज देतांना तिच्या मालकी हक्काचे कागद केवळ ताब्यांत घेतलें तरी चालतें, ही इलाख्यांच्या राजधानींतील व्यवहारास मिळणारी सवलत सर्व म्युनिसिपालिट्यांच्या क्षेत्रांतील व्यवहारांस मिळावी, इत्यादि ठरावहि परिषदेनें केले. दि सांउथ इंडियन जॉइंट स्टॉक बँक असोसिएशन ह्या नांवाची एक संस्था स्थापन करण्याचें परिषदेनें ठरविलें. स्वतंत्र बँकिंग कायद्याची आवश्यकता नाहीं असें नमूद करणारा ठराव सर्वांस मान्य होण्याजोगा खास नाहीं; परंतु बाकीच्या ठरावांकडे सरकारचें लक्ष वेधलें जाणें अगत्याचें आहे. बँकिंगच्या धंद्याचें योग्य नियंत्रण होणें आवश्यक असलें, तरी लहान परंतु चांगल्या बँकांची प्रगति त्यानें खुंटतां कामा नये.

### वेस्टर्न इंडिया विमा कंपनीची प्रगति

वेस्टर्न इंडिया विमा कंपनीच्या १९३८ अखेरच्या मूल्यमापनाचा वृत्तांत आजच्या अंकांत पृ. १७५ वर देण्यांत आला आहे, त्यावरून ह्या कंपनीच्या प्रगतीची चांगली कल्पना येईल. १९३६ ते १९३८ अखेर ह्या मुदतींत कंपनीकडील पॉलिसींची संख्या २२,५०९ ची ३४,८७५ झाली आणि चालू कामांत १३/४ कोटि रुपयांची भर पडली. विम्याचें वार्षिक उत्पन्न ७ लाखांनीं वाढलें आणि विमा निधि ६०१/२ लक्ष रुपयांचा ९७ कोटींपर्यंत आला. कंपनीचें मूल्यमापन व्याजाचा दर ४ टक्के धरून करण्यांत आलें आहे. कंपनीच्या जिंदगीची आजच्या बाजारभावानें किंमत १९३८ अखेरच्या बाजारभावानें होणाऱ्या किंमतीपेक्षा थोडी कमी भरली, तरी मूळ किंमतीपेक्षा अधिक येणारी किंमत हिशेबांत न घेण्याचें कंपनीचें नेहमीचें धोरण असल्याकारणानें, बाजारभावाच्या उताराचा दुष्परिणाम कंपनीच्या परिस्थितीवर होण्याजोगा नाहीं. कंपनीनें अवलंबिलेलें सावधगिरीचें आणि मजबुतीचें धोरण बाजारभावाच्या आंदोलनाचे वेळीं तिला उत्कृष्ट रीतीनें सहायकारक होत आहे आणि होईल. कंपनीची आर्थिक परिस्थिति सुदृढ करणारे इतर फंडहि आहेतच. वेस्टर्न इंडियानें बोनसचा दर थोडा उतरविण्यांत आत्मविश्वास दाखविला आहे आणि तो वास्तविकहि आहे. इतर कंपन्यांना तिनें योग्य धडा घालून दिला आहे. कंपनीचें हें पाऊल योग्य दिशेनेंच पडलेलें आहे. त्यामुळें कंपनीच्या कीर्तींत भर पडून तिची आणखी प्रगति आणि उत्कर्ष हीं घडून येण्यास मदतच होईल, ह्यांत संशय नाहीं. वेस्टर्न इंडियाचें हिंदी विमा कंपन्यांतील मानाचें स्थान मजबूत पायावर आधारलेलें आहे.

### व्यापार वाढविण्यासाठीं नवीन कंपनीची योजना

"ग्रेट ब्रिटनला कांहीं विशिष्ट तटस्थ राष्ट्रांशीं व्यापार करण्यास सहाय व्हावें, ह्यासाठीं ब्रिटिश सरकारनें इंग्लिश कमर्शिअल कॉर्पोरेशन ह्या नांवानें एक स्वतंत्र कंपनी काढण्याचें ठरविलें आहे. कंपनीस भांडवल सरकार पुरवील." असें सर जॉन सायमन ह्यांनीं कॉमन्स सभेंत नुकतेंच जाहीर केलें. ही कंपनी तूर्त बल्गेरिया, ग्रीस, हंगेरी, रुमानिया, तुर्कस्तान आणि युगोस्लाव्हिया ह्या देशांशीं व्यापार सुरू करील. स्वतंत्र व्यापारी संस्था ह्या नात्यानें कंपनीचें काम चालेल. धोरण आखतांना ती अर्थातच सरकारचा सल्ला घेईल. ही कंपनी युद्ध परिस्थितीपुरतीच चालू रहावयाची नसून, तिला चिरस्थाइकपणा प्राप्त करून दिला जाईल असें समजतें. सरकारनें जिचें संपूर्ण भांडवल पुरविलेलें आहे, अशी ही पहिलीच ब्रिटिश कंपनी आहे. लॉर्ड स्विन्टन हे कंपनीच्या डायरेक्टर बोर्डाचे अध्यक्ष आहेत.

### बँकेची इमारत विमा कंपनीनें घेतली

त्रावणकोर नॅशनल अँन्ड क्विलॉन बँकेची मद्रास शहरांतील मुख्य कचेरीची इमारत ईस्ट अँन्ड वेस्ट इन्शुअरन्स कंपनीनें १ लक्ष, ४७ हजार रुपयांस विकत घेतली आहे.

### पॉवर ऑल्कोहोलचें उत्पादन—नवीन स्वदेशी धंदा

आधुनिक पद्धतीनें कारखान्यांत साखर तयार होते, त्यावेळीं खाण्यास निरुपयोगी अशी काकवी काढून टाकण्यांत येते. गुळाच्या उत्पादनांत निघणाऱ्या काकवीचा उपयोग खाण्याकडे होतो. पण कारखान्यांतल्या कृतींत रहाणाऱ्या काकवीचा अशा प्रकारचा उपयोग होऊं शकत नाहीं. ह्या काकवीपासून उपयुक्त पदार्थ बनवतां आले आणि त्यांस किंमत आली तर उत्पादन वाढेल व त्याचा खर्च कमी होऊन साखरेच्या धंद्यांत नफा अधिक राहील हें उघड आहे. वाया जाणाऱ्या पदार्थांत किंमत निर्माण करणें म्हणजे संपत्तीचें उत्पादन करणें होय. ह्या गोष्टीच्या जाणीवेनें कारखान्यांत वाया जाणाऱ्या काकवीपासून जनावरांचें खाद्य बनवण्याचे व खत तयार करण्याचे प्रयत्न आतांपर्यंत झाले आहेत, पण त्यांस म्हणण्यासारखें यश न येऊन हजारों मण काकवी ह्या देशांत आज फुकट जात आहे. शास्त्रीय शोधांअंतीं काकवीचा यंत्रप्रेरक ऑल्कोहोल तयार करतां येतो असें मात्र सिद्ध झालें आहे आणि ह्या संबंधांतले प्रयोग यशस्वी ठरले आहेत. काकवीमधून निघणारा ऑल्कोहोल पेट्रोलमध्यें मिसळला असतां त्याचा चांगला उपयोग होतो असें आढळलें असून म्हैसूर संस्थानांत सरकारच्या सहायानें ह्याचा यशस्वी धंदा बनला आहे. दारू गाळण्याच्या कारखान्यांची (डिस्टिलीज) सामुग्री ह्या कामीं उपयोगी पडते. युद्धामुळेंच पेट्रोलचा पुरवठा हात राखून वापरणें अगत्याचें झालें असतां काकवीचा ऑल्कोहोल मोटारीसाठी वापरणें अत्यंत सहायकारक होण्यासारखें आहे. संयुक्त प्रांतांतील कॉंग्रेस मंत्रिमंडळानें स्थानिक साखरेच्या कारखान्यांत निघणाऱ्या काकवीचा पॉवर ऑल्कोहोल बनवण्याबाबत एक कायदा पास केला होता आणि त्याच्या अंमलबजावणीसाठीं नियमहि तयार केले होते. परंतु त्या मंत्रिमंडळानें अधिकारत्याग केल्यानें ह्या कायद्यास गव्हर्नरांची संमति मिळून त्याचा अंमल होण्याचें तसेंच राहून गेलें आहे. काकवीपासून पॉवर ऑल्कोहोल करण्याचा धंदा महत्वाचा युद्धोपयोगी धंदा आहे ह्यांत शंका नाहीं. ह्यासाठी हिंदुस्थान सरकारनें प्रस्तुत प्रश्नांत तात्काळ लक्ष घालून त्यास उत्तेजन देणें अगत्याचें आहे. आमच्या मुंबई प्रांतांत आतां साखरेच्या उत्पादनास महत्त्व प्राप्त झालें आहे. महाराष्ट्रामधील दहा कारखान्यांत मिळून कितीतरी काकवी फुकट चालली आहे. तिचे चार पैसे करतां आले तर येथील स्वदेशी साखरेच्या धंद्यास सहाय मिळेल आणि एक नवीन उद्योग निर्माण होईल. ह्या योगानें पेट्रोलमध्यें बचतहि होऊन सरकारची आणि जनतेची सोय होण्यासारखी आहे. स्वदेशी धंदे, विशेषतः ते युद्धोपयोगी असतील, तर निर्माण करण्यास आणि त्यांचे संबंधांत शास्त्रीय संशोधन होण्यास मदत देण्याची तयारी हिंदुस्थान सरकारनें दाखवली आहे. मुंबई सरकारनें प्रस्तुत प्रश्नाकडे लक्ष पुरवून मध्यवर्ती सरकाराच्या सहकारितेनें विधायक कृति करणें आवश्यक आहे. महाराष्ट्रीय साखरेच्या कारखानदारांनींहि हें प्रकरण हातीं घेऊन त्यास चालना दिली पाहिजे. संयुक्त प्रांताचें सरकार व म्हैसूर दरबार ह्यांनीं उदाहरण घालून दिलें आहे आणि त्याप्रमाणें कृति इतरत्र होणें अगत्याचें आहे.

---

### युद्धाचे आर्थिक परिणाम

युरोपांतील राष्ट्रें युद्धाप्रीत्यर्थ दररोज सुमारें १५ कोटि रुपये खर्च करीत आहेत, त्याचा परिणाम त्या देशांतील रहाणीचे मानावर झाल्याविना रहाणार नाहीं आणि अमेरिकेंतील रहाणीचें मान आणि युरोपांतील रहाणीचें मान ह्यांत भयंकर तफावत पडेल, असें हिंदुस्थान सरकारचे आर्थिक तज्ञ, डॉ. ग्रेगरी हे आपल्या एका भाषणांत नुकतेच म्हणाले. युद्धसमाप्तीनंतर युरोपांतील देश एकत्र येऊन सहविचारानें आपलें धोरण आखतील ही कल्पना फोल ठरून प्रत्येक देश जबर संरक्षक जकातींचा अवलंब करूं लागेल, असें मत त्यांनीं व्यक्त केलें. रहाणीचें मान उतरलें म्हणजे लोकसत्तात्मक राज्यपद्धति टिकणें कठीण जातें, असेंहि ते म्हणाले.

चेअरमन,
व्ही. एन. पाटील, एस्क्वायर,
एम. ए., कॅन्टब, बार-ॲट-लॉ,
माजी एम. एल. सी.
मॅनेजिंग एजंट,
पी. आय. पाटील ॲंड सन्स

पंचवार्षिक बोनस
तहहयात रु. ६० दर हजारी हयातींत रु. ५०

प्रगतीच्या पथावर असलेली
वि
ग्रेट सोशल लाईफ ॲण्ड जनरल ॲशुरन्स लिमिटेड.
ब्रँच ऑफिस–लक्ष्मीरोड, पुणें. S एजन्सीकरितां अर्जा करा. S हेड ऑफिस–जळगांव, पू. खा.

पूर्ण स्वदेशी.
कमी प्रिमियम, जास्त नफा.
विमेदारांस अत्यल्प हप्त्यांत
भरपूर सवलती
आधुनिक शास्त्रशुद्ध विम्याच्या उपयुक्त
विविध योजना. सविस्तर माहिती मागवा.

के. जी. चौधरी,
ब्रँच मॅनेजर.

के. एच. सुरणा विमा केसरी,
जनरल मॅनेजर.

## वेस्टर्न इंडिया विमा कं. लि.

### १९३८ साल अखेरचें ८ वें त्रैवार्षिक मूल्यमापन

वेस्टर्न इंडिया विमा कंपनीचें १ जानेवारी, १९३६ ते ३१ डिसेंबर, १९३८ अखेरचें मूल्यमापन कंपनीचे अॅक्चुअरी व मॅनेजर, श्री. कृ. य. जोशी,बी. ए.,ए. आय. ए. यांनीं केलेलें आहे.

### तीन वर्षांतील प्रगति

या मूल्यमापनाचे वेळीं चालू असलेल्या विमापत्रांची ( पॉलिसींची ) संख्या ३४,८७५ असून नफ्यासुद्धां एकंदर जोखमीची रक्कम सव्वाचार कोटी रुपयांवर गेली आहे. मागील म्हणजे सन १९३५ साल अखेरच्या मूल्यमापनाचे वेळीं विमापत्रांची संख्या २२,५०९ असून नफ्यासुद्धां जोखमीची रक्कम पावणेतीन कोटी रुपयांवर होती. एकंदर चालू कामांत सुमारें दीड कोट रकमेची वाढ झाली आहे. त्याचें मुख्य कारण म्हटलें म्हणजे कंपनीस १ जानेवारी १९३६ ते ३१ डिसेंबर १९३८ या तीन वर्षांत २ कोटी १४ लक्ष रुपयांचें भरपूर नवीन काम मिळूं शकलें हेंच होय. वाढत्या कामाबरोबरच विम्याचे हप्त्याचे उत्पन्नांत वाढ झाली असून १९३५ साल अखेर हें उत्पन्न १३,६४,००० रुपये होतें तें १९३८ अखेर रु. २०,७९,००० वर येऊन पोंचलें आहे. विमा-निधींतही वरीलप्रमाणें वाढ होऊन १९३५ अखेर हा निधि रुपये ६०,४२,८७३ होता तो १९३८ साल अखेर रु. ९६,८९,६०५ वर आला आहे. हें मूल्यमापन गेल्या खेपेप्रमाणेंच व्याजाचा दर ४ टक्के धरून करण्यांत आलें आहे. मागील मूल्यमापनाचे प्रमाणाशीं ताडून पाहतां नफ्याचे विमा करारांकरितां केलेली तरतूद अधिक असल्याचें दिसून येईल,म्हणजे मूल्यमापनास आधारभूत धराव्या लागणाऱ्या बाबींपैकीं खर्चाकरितां राखावयाचें प्रमाण ठरवितांना जास्त तरतूद केली असल्याचें दिसून येईल. कामाचे प्रमाणांत पुष्कळच वाढ झाली असूनही त्या मानानें खर्चाचे प्रमाणांत वाढ झालेली नाहीं ही गोष्ट विशेष लक्षांत घेण्यासारखी आहे.

वरील पद्धतीनें मूल्यमापन केल्यावर कंपनीवरील निव्वळ जोखीम रुपये ८५,४४,७६८ इतक्या रकमेची निघाली ती वजा करतां नफा वांटणीकरितां रु. ११,४४,७६८ इतकी रक्कम शिल्लक राहिली यांतच दरम्यानच्या नफ्याचाही ( इंटेरियम बोनस ) समावेश करण्यांत आला आहे.

### नफावांटणी

नफ्याचे वांटणीकरितां उरणाऱ्या रकमेंतून भागिदारांचे हमीचे ठराविक ५ टक्के व्याजाची तरतूद केल्यावर जो नफा राहतो त्यांतून ९० टक्के नफा विमेदारांत वांटण्याची आतांपर्यंत वहिवाट असे. चालू कामाच्या वाढीबरोबर विमेदारांना मिळणाऱ्या नफ्याचा खर्चही वाढला आहे. त्या मानानें भागिदारांना घाव्या लागणाऱ्या व्याजाचा खर्च बराच माफक आहे. ही वस्तुस्थिति लक्ष्यांत घेऊन जेव्हां व्याज स्थिरता राखणारा निधि ( डिव्हिडंड इक्वलायझेशन फंड ) कंपनीच्या भरपाई झालेल्या भांडवलाच्या दुपटीइतका होईल व हमीचे ठराविक व्याजाची तरतूद होऊन उरलेल्या नफ्यांतून भागिदारांस ३० टक्के व्याज मिळूं शकेल, त्या वेळीं वरीलप्रमाणें उरलेल्या नफ्याचे रकमेंतून शेंकडा ९५ टक्के नफा विमेदारांस वांटण्याची तरतूद कंपनीच्या नियमांत केली आहे. सध्यांचे मूल्यमापनप्रसंगीं या दोन्ही शर्ती पुऱ्या होत असल्यानें वरील नफ्यापैकीं शें. ९५ टक्के इतका नफा विमेदारांस वांटणें शक्य झालें आहे. या धोरणानें नफ्याची वाटणी पुढीलप्रमाणें करण्यांत येत आहे.

| | | |
|---|---|---|
| विमेदारांमध्यें | रु. | १०,५१,५४१ |
| भागीदारांमध्यें शे. ३० प्रमाणें व्याज | रु. | ३४,२९८ |
| व्याजाची स्थिरता राखणाऱ्या निधीस जमा | रु. | ३२,५९५ |
| विमेदारांच्या नफ्याचे निधीस जमा | रु. | २६,३३४ |
| | रु. | ११,४४,७६८ |

विमेदारांच्या वांट्यास आलेल्या नफ्यामधून हयातीनंतरच्या नफ्याच्या विमापत्रांना त्रैवार्षिक दरसाल दर हजारीं रु. २२-८ व इतर नफ्याचे विमापत्रांना रु. १८ या प्रमाणें नफा विम्याचे रकमेंत वाढवून देण्याचें जाहीर करण्यांत आलें आहे. यांशिवाय मूल्यमापनाचें तारखेस जे विमे ( नफ्यासह ) चालू असतील अशा सर्व विमा करारावर सन १९३८ सालापुरतें हजारी रुपया एक या दरानें जादा नफा ता. २६-२-३९ रोजीं कंपनीच्या रजत महोत्सव प्रसंगीं जाहीर केल्याप्रमाणें देण्यांत येत आहे. गेल्या मूल्यमापानापेक्षा या वेळीं विमेदारांना जाहीर करण्यांत आलेला नफा थोडासा कमी झाला आहे, परंतु त्याचें कारण कंपनीचें फाजील काटेकोरपणाचें धोरण हें नसून गेलीं कांहीं वर्षें पैसा सवंग झाल्यानें व्याजाचे उत्पन्नांत जी घट पडली त्याचा अपरिहार्य असा हा परिणाम आहे. अव्वल दर्जाच्या विमा कंपन्यांनीं अलीकडील मूल्यमापनांत नफा वांटणीचें प्रमाण कमी केलेलें आहे.


**वेस्टर्न इंडिया लाइफ**

**इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड**

सातारा स्थापना १९१३

सन १९३८ अखेरच्या

आठव्या मूल्यमापनाचा

**प्रोत्साहक निकाल**

| | |
|---|---|
| चालू विमे | ४,२५,००,००० रु. |
| | त्रैवार्षिक वाढ शें. ५४ |
| जीवननिधि | ९६,८९,००० रु. |
| | त्रैवार्षिक वाढ शें. ६० |
| हप्त्यांचें उत्पन्न | २०,७९,००० रु. |
| | त्रैवार्षिक वाढ शें. ५२ |
| फायदा | ११,४४,००० रु. |
| | त्रैवार्षिक वाढ शें. २४ |

मजबूत आर्थिक स्थिति आणि प्रगतिपर कारभार यांमुळें या कंपनींत विमा उतरणें अगर एजन्सीचें काम करणें हितावह होईल.

विशेष माहितीसाठीं खालील पत्त्यावर लिहा

पुणें शाखा
१७९ बुधवार पेठ
लक्ष्मीरोड, पुणें शहर.

मॅनेजर
वेस्टर्न इंडिया लाइफ
इन्शुअरन्स कं. लि. सातारा

## ऑल इंडिया मुस्लिम चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्री

### प्रांतिक सरकाराकडे लायसेन्ससाठी अर्ज

व्यापार, कला, शास्त्रें, धर्म, दान, इत्यादि उपयुक्त गोष्टी करण्यासाठी नियमित जबाबदारीच्या तत्त्वावर एकादी संस्था निघत असल्यास आणि ही संस्था आपल्या नफ्याचा विनियोग आपलें उद्दिष्ट साध्य करण्याकडे खर्चणार असल्यास व ती आपल्या सभासदांस डिव्हिडंड न देण्याचें बंधन स्वतःवर घालून घेणार असल्यास आणि त्या बाबत प्रांतिक सरकारची खात्री झाल्यास तें त्या संस्थेस लायसेन्स देऊन कंपनी म्हणून नोंदून घेऊं शकतें आणि तिचें शेवटीं 'लिमिटेड' हा शब्द लावण्याची तें माफी देऊं शकतें. हा लायसेन्स देतांना त्या संस्थेवर जरूर त्या अटी लादून त्यांचा समावेश मेमोरँडम आणि आर्टिकल्समध्यें करण्यांत आला पाहिजे, असा आग्रह प्रांतिक सरकारास धरतां येतो. संस्था नोंदण्यांत आली, म्हणजे तिला लिमिटेड कंपन्यांस मिळणाऱ्या सवलती उपलब्ध होतात आणि त्यांचेवरील बंधनेंहि संस्थेवर येतात. हा लायसेन्स सरकारास रद्दहि करतां येतो. त्यानंतर मात्र संस्थेच्या नांवाचे शेवटीं 'लिमिटेड' हा शब्द नेहेमी लिहावा लागतो आणि संस्थेस कंपनी कायद्याच्या २६ व्या कलमानें दिलेल्या कांहीं सवलतीहि नाहींशा होतात.

"ऑल इंडिया मुस्लिम चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्री" ह्या नांवानें वरील प्रकारची संस्था काढण्याचें घाटत आहे आणि त्यासाठी लायसेन्स मिळण्याबाबत मुंबई सरकारकडे अर्ज गेला आहे. ह्या नियोजित चेंबरचे उद्देश खालीलप्रमाणें आहेत:—

१ हिंदी व्यापाऱ्यांच्या सामुदायिक हिताच्या दृष्टीनें मुस्लिम व्यापारीवर्गांत स्नेहभावना आणि एकी वाढून येण्यास प्रोत्साहन देणें.

(२) मुस्लिमांत व्यापारी, औद्योगिक आणि शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार करणें आणि त्यासाठी संस्था स्थापणें आणि चालवणें.

(३) जरूर तेव्हां आणि योग्य वाटेल त्या वेळीं आणि स्थळीं व्यापारी आणि औद्योगिक परिषदा भरवणें.

असोसिएशनचे इतर उद्देश मेमोरँडमध्यें देण्यांत आले आहेत.

### पार्लमेंटांतील कामकाजाची प्रसिद्धी

ब्रिटिश पार्लमेंटांतील भाषणांचा आणि प्रश्नोत्तरांचा समग्र वृत्तांत हॅन्सर्डमध्यें देण्यांत येतो, त्याच्या दररोज फक्त १,२०० प्रती खपतात. प्रत्येक प्रतीची किंमत ९ पेन्स असते. हॅन्सर्ड तयार करण्यास दरवर्षी ४½ लक्ष रुपये खर्च येतो, परंतु विक्रीचे ८०–९० हजार रुपये सुद्धा जमत नाहींत. ग्रन्थालयांस अर्धी किंमत आकारली जाते, परंतु ह्या सवलतीचा फायदा घेणारीं १२८ सुद्धां ग्रन्थालयें नाहींत. हॅन्सर्डची साप्ताहिक आवृत्ति काढली तर ती लोकप्रिय होईल, अशी एक कल्पना पार्लमेंटाच्या एक सभासदानें पुढें आणली ती सिलेक्ट कमिटीनें नामंजूर केली. मेट्रोपोलिटन वृत्तपत्रांतहि पार्लमेंटांतील भाषणें आणि प्रश्नोत्तरें ह्यांस महत्त्वाचें स्थान दिलेलें आढळत नाहीं.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

(सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली)

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग
९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती (जि. पुणें) | १६ अकलूज (जि. सोलापूर) |
| २ सातारा (" सातारा) | १७ विरमगांव (" अहमदाबाद) |
| ३ इस्लामपूर (" ") | १८ धुळें (" प. खानदेश) |
| ४ कऱ्हाड (" ") | १९ दोंडाईचें (" ") |
| ५ तासगांव (" ") | २० शिरपूर (" ") |
| ६ किर्लोस्करवाडी (" ") | २१ शहादें (" ") |
| ७ शिराळें (" ") | २२ नंदुरबार (" ") |
| ८ कोरेगांव (" ") | २३ साक्री (" ") |
| ९ वाई (" ") | २४ शिंदखेडें (" ") |
| १० अहमदनगर (" अहमदनगर) | २५ तळोदें (" ") |
| ११ शेवगांव (" ") | २६ मालेगांव (" नाशिक) |
| १२ कोपरगांव (" ") | २७ सटाणा (" ") |
| १३ भिवंडी (" ठाणें) | २८ कळवण (" ") |
| १४ पालघर (" ") | २९ दोहद (" पंचमहाल) |
| १५ कल्याण (" ") | ३० कालोला (" ") |

## खेळतें भांडवल रु. २०००००००चेवर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## जपानचा प्रमुख निर्गत व्यापार

### कपाशीचें सूत व कापड

कपाशीचें सूत व कापड ह्यांचा जपानचे निर्गत व्यापारांत प्रामुख्यानें समावेश होतो. इंग्लंडमध्यें ह्या धंद्यास प्रारंभ झाल्यानंतर १०० वर्षांनीं, सुमारें १८७० मध्यें, जपानमध्यें त्यास सुरवात झाली, परंतु त्या बाबतींत आज जपान देशास अग्रेसरत्व प्राप्त झालें आहे. १८९४-९५ मधील चीन-जपान युद्धाचे प्रसंगीं कपाशीच्या सुताच्या व कापडाच्या धंद्यांस जपानमध्यें जोराची चालना मिळाली आणि १९०४-५ च्या रशिया जपान युद्धाचे वेळीं त्या धंद्यानें आणखी प्रगति केली. गेल्या महायुद्धाचे प्रसंगीं मात्र ह्या जपानी धंद्यानें चांगलेंच मूळ धरलें आणि त्यास जागतिक महत्त्व प्राप्त झालें. महायुद्धानंतरची मंदीची झळ इतर धंद्यांप्रमाणें ह्या धंद्यासहि लागली, परंतु त्यामुळें यंत्रसामुग्री आणि उत्पादन पद्धति सुधारण्यास सवड मिळाली. त्याचा परिणाम म्हणजे उत्पादनाचा खर्च कमी झाला आणि १९३३ मध्यें निर्गतीचे बाबतींत जपान लँकेशायरला मागें टाकूं शकला! त्यानंतरची कांहीं वर्षें कठीण गेलीं. बहुतेक सर्व देशांनी जपानी मालावर जबर जकाती बसविल्या. पुढें जपाननें हिंदुस्थान, ग्रेट ब्रिटन, डच ईस्ट इंडीज, इजिप्त, इत्यादि देशांशीं व्यापारविषयक बोलणीं चालू केलीं. चीन-जपान युद्धपरिस्थिति विकट झाल्यापासून जपाननें कपाशीच्या आयातीवर नियंत्रण घातलें आहे. त्यामुळें आतां उत्पादन कमी झालें आहे.

---

### पार्लमेंटचे सतत ५० वर्षे सभासद

मि. लॉइड जॉर्ज ह्यांच्या पार्लमेंटाच्या सभासदत्वास चालू वर्षी ५० वर्षे पुरी होतात. त्यांस कोणत्याहि निवडणुकींत अपयश आलेलें नाहीं आणि त्यांनीं आपला मतदार संघ बदललेला नाहीं. इतर मुख्य प्रधानांच्या निवडणुकीचा इतिहास इतका सरळ नाहीं. मि. नेव्हाइल चेंबर्लेन हे बर्मिंगहॅम मतदार संघामार्फत लागोपाठ निवडून आले तरी त्यांनीं आपला मतदारसंघ बदललेला आहे. मि. बाल्डविन हे त्यांच्या पहिल्याच निवडणुकींत अयशस्वी झाले. मि. रॅम्से मॅक्डोनल्ड ह्यांनीं चार मतदार संघामार्फत वेळोवेळ निवडून येण्याचा प्रयत्न केला आणि त्यांत दोन वेळीं ते यशस्वी झाले नाहींत. मि. अस्क्विथ ह्यांनीं दीर्घ काळ मुख्य प्रधानाचें काम करूनहि त्यांस निवडणुकींत अपयश आलें. बाल्फर, डिझरेली, रसेल, पामर्स्टन, पील, ग्लॅडस्टन, ह्या सर्वांस केव्हांना केव्हां तरी अपयश आलेलें आहे आणि त्यांपैकीं कोणीहि मि. लॉइड जॉर्जइतक्या दीर्घ काळ पार्लमेंटचे सभासद नव्हते. कँबल बॅनरमन हे त्यांच्या पहिल्या निवडणुकींत पडले परंतु पुढें ४० वर्षे एकाच मतदारसंघांतून सतत निवडून आले तरी मि. लॉइड जॉर्ज ह्यांच्याशीं त्यांची बरोबरी होत नाहीं. वेल्समधील कार्नरव्हनमधील म्हणजे मि. लॉइड जॉर्ज ह्यांच्या मतदारसंघांतील लोक १२ एप्रिल रोजीं मि. लॉइड जॉर्ज ह्यांच्या पार्लमेंटरी सभासदत्वाचा सुवर्ण महोत्सव साजरा करणार आहेत. हा उत्सव केवळ लिबरल पक्षांतर्फेच साजरा होणार नसून त्यास सर्वपक्षीय स्वरूप देण्यांत येणार आहे. त्यानिमित्त एक शिलिंग फंड काढण्यांत आला आहे.

---


पूर्व खानदेश
सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.
जळगांव.
(स्थापना : मे १९१६)

| | रु. |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल. ...... | १०,००,०००।- |
| जमा झालेलें शेअर भांडवल....... | ४,६९,०००।- |
| रिझर्व्ह फंड. ...... | २,९८,०००।- |
| इतर फंडस्. ...... | ३,७७,०००।- |
| खेळतें भांडवल (३०-६-३९) ...... | ५७,८९,०००।- |

डिव्हिडंड पांच टक्के (सहा वर्षांपासून)

हेड ऑफिस :—सेंट्रल को-आपरेटिव्ह बँक बिल्डिंग,
नवी पेठ, जळगांव.

पूर्व खानदेश जिल्ह्यांतील सर्व भागांत शाखा व पे-ऑफिसेस चांगल्या रीतीनें चालू आहेत.

—: बँकर्स :—
मुंबई : मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-आपरेटिव्ह बँक लि. मुंबई.
जळगांव : इंपीरिअल बँक ऑफ इंडिया.
अहमदाबाद : बँक ऑफ इंडिया लि.
नागपूर : सी. पी. अँड बेरार प्रॉव्हिन्शिअल को-आपरेटिव्ह बँक लि. नागपूर.

बँकेचे हिशेब त्रैमासिक रजिस्टर्ड अकौंटंटचे फर्मकडून व वार्षिक सरकारी स्पेशल ऑडिटराकडून तपासले जातात.

चालू ठेवीवर : अर्धा टक्का व्याज दिलें जातें.
सेव्हिंग्ज ठेवीवर : दोन टक्के व्याज देण्यांत येतें.
मुदतीच्या ठेवीवर : तीन ते साडे चार टक्के व्याज मुदतीप्रमाणें देण्यांत येतें.

ठेवीदाराचे व्यवहार सोयीप्रमाणें बँकर्स मार्फत केले जातात. बँकेशीं व्यवहार करणारांचे सोयीप्रमाणें बँकर्स मार्फत योजना करण्यांत येते.

सर्व प्रकारच्या मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात. सर्व प्रकारचा बँकिंगचा व्यवहार केला जातो. ठेवीवरील व्याजाचे दर अगर व्यवहाराच्या अटी समक्ष अगर पत्रद्वारें कळविण्यांत येतील.

को-ऑपरेटिव्ह संस्थांना मुदतीच्या ठेवीवर इतरांपेक्षा अर्धा टक्का व्याज जास्त देण्यांत येतें.

वी. डी. देशमुख,
चेअरमन.



बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी ताजी आवृत्ति प्रसिद्ध झाली.
किं. १ रु. ८ आणे.
१ रु. १० आ. ६ पै चीं तिकिटें पाठवून मागणी करा.
: लेखक :
मो. वा. गो. काळे ◆ श्री. श्री. वा. काळे
बँकिंगविषयक प्रश्नांचें विवेचन करणारें
अत्यंत उपयुक्त पुस्तक
"अर्थ" ग्रन्थमाला, : : पुणें ४.

## शेतीच्या मालाच्या उठावास सहाय

### कोठारें बांधण्यासाठी सरकारी कर्ज

शेतीच्या मालाचा उठाव करण्यास तो साठविण्याची व्यवस्था आवश्यक आहे. त्याचप्रमाणें बाजाराच्या गांवीं वाळविण्यासाठी, माळ्यानें देण्यासाठी अगर विक्रीसाठी खळें, नांगर इत्यादि ठेवणें जरूर आहे. सहकारी मल्टिपर्पज सोसायट्यांना अशीं कोठारें बांधण्यास उत्तेजन देण्यासाठी त्यांस येणाऱ्या खर्चाच्या दोन तृतीयांशाइतकी रकम ४% ह्या सवलतीच्या व्याजाच्या दरानें कर्जाऊ देण्याचें सरकारनें योजिलें आहे. २ हजार रुपये ही कर्जाची कमाल मर्यादा राहील, परंतु त्यापेक्षा अधिक कर्जाची आवश्यकता असल्यास त्यास सरकारची मंजुरी लागेल. रजिस्ट्रारनें ठरविलेल्या पद्धतीनें कोठारें बांधण्यांत आलीं पाहिजेत. कर्जाविषयीं तपशीलवार माहिती त्यासंबंधांत तयार केलेल्या नियमांवरून मिळेल. ह्या नियमांची प्रत रजिस्ट्रारच्या ऑफिसांत मिळूं शकेल.

---

### गेल्या १२ वर्षांतील अमेरिकेची औद्योगिक प्रगति

१९२९ ते १९३८ ह्या मुदतींत अमेरिकेची लोकसंख्या ७·१% वाढून ती १३ कोटि झाली. ह्या वाढलेल्या सर्व लोकसंख्येस काम पुरविणें अमेरिकेस शक्य झालेलें नाहीं. डिसेंबर, १९३९ मध्यें ८४½ लक्ष लोक बेकार होते; १९२९ च्या सरासरीचा तत्सम आकडा ४½ लक्ष आहे. खालील तक्त्यांत अमेरिकेंतील लोकांच्या उदरनिर्वाहाच्या साधनांची माहिती दिली आहे, तीवरून नोकरीखेरीज इतर व्यवसायांत अधिक लोकांस काम मिळालेलें दिसत नाहीं. तथापि कारखान्यांतून काम करीत असलेल्या लोकांची उत्पादनशक्ति मात्र वाढलेली आढळली. प्रत्येक मनुष्याचें दर ताशी उत्पादन २०% वाढलें, परंतु वेतनांत फक्त ६% वाढ झाली. कामाचे आठवड्यांतील तास मात्र २२½% कमी झाले. म्हणजे, कामगारांस अधिक विश्रांति मिळूं लागली. गेल्या डिसेंबरांत २७ प्रकारच्या उद्योगधंद्यांतील कामाच्या तासांची सरासरी घेतली, ती आठवड्यांत ३९½ तास इतकी पडली. खालील तक्त्यांत अमेरिकेंतील लोकांच्या उदरनिर्वाहाच्या साधनांची तुलनात्मक माहिती दिली आहे:—

उदरनिर्वाहाच्या साधनांचा अवलंब

| | १९२९ सरासरी % | १९३९ डिसेंबर % |
|---|---|---|
| शेती | २२०·० | २१·९ |
| जंगल आणि मासेमारी | ०·६ | ०·५ |
| खाणी | २·२ | १·७ |
| कारखाने | २३·१ | २३·८ |
| बांधकाम | ७·० | ४·७ |
| बिनसरकारी वीज कंपन्या इ० | ५·१ | ४·२ |
| व्यापार मालाचा उठाव इ० | १९·७ | १७·३ |
| नोकरी | १८·८ | २१·८ |
| इतर | २·१ | २·१ |
| | १०० | १०० |

स्पृहणीय यश
बोनसचे दरांत २० टक्के वाढ
तारीख १० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या
मूल्यमापनाचा निकाल.
हयातीनंतरचे विम्यावर रु. ५४ | त्रैवार्षिक- दर हजारीं बोनस | हयातींतील विम्यावर रु. ४५
आजच "कॉमनवेल्थ" ची पॉलिसी घेऊन
कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.
दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स
कंपनी लि० पुणें
लिहा अगर समक्ष भेटा.
श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.
सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट पाहिजेत, अटींवर नेमणें आहेत.

रूरल प्रॉडक्टस् कं. लि. चे
★ संत्रा ड्रिंक ★ जांभळाचा रस
★ जांभळाच्या बियाची पूड ★ इतर रस व पेयें
सर्व मोठ्या व महत्त्वाच्या ठिकाणीं विकण्यासाठीं जबाबदार प्रतिनिधि पाहिजेत.
रजिस्टर्ड ऑफिस: ७५४ शुक्रवार, पुणें २ | बिझिनेस ऑफिस: ११२A सदाशिव, पुणें २
न. गं. आपटे, बी. एजी., एम्. एस्सी.

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
Examiner Press Building, Dalal Street, Bombay
716 Sadashiv Peth, Poona City

K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |
| **सरकारी आणि निमसरकारी रोखे** | |
| ४% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११२—१ |
| ५% ( १९४०–४३ ) लोन ... — ... | १०१—८ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०६—० |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९५—६ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०४—६ |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ९४–१२ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९७—४ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०६—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०५—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... .. | ११०–१२ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२१—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

| | |
|---|---|
| **बँका** | |
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% ... ... | १३९—८ |
| बँक ऑफ बडोदा ( १००—५० ) १०% ... ... | १००—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ४% ... | ३६–१४ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५२०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ४% ... ... | ५३—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०६—० |
| **वीज** | |
| बाँबे डॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ११% ... ... | १३१–१२ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | १५१—४ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | १८२—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १३४७—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १५२७—८ |
| **रेल्वेज** | |
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | ९५—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) २% ... ... | ६४—० |
| अहमदाबाद प्रांतिज (५००) १२½% | ९६२—८ |
| ताप्ती व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७५७—८ |
| **इतर** | |
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | २१५—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४७—० |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | १९—८ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ... | ३८–१२ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४३८०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २०६–१४ |
| टाटा आयर्न डु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १४४—४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३८४—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै... | २०७०—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु ... | १२१—४ |





एजंटः—

**महादेव गोविंद कुलकर्णी**

किराणा व भुसार मालाचे व्यापारी

७८६ सदाशिव, पुणें शहर.

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन

**जर्निमन टेलर व्हा.**

मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष

**पराडकर टेलर्स ॲकेडिमी,** ६७१ सदाशिव, पुणें.

हप्त्याचे अत्यंत कमी दर असलेल्या

# दि ग्रेट सोशल लाइफ ॲन्ड जनरल ॲशुअरन्स कं. लि.

**ह्या महाराष्ट्रीय विमा संस्थेचा पहिल्या पंचवार्षिक मूल्यमापनाचा निर्णय**

हयातींतील विम्यावर दर हजारीं **५०**

हेड ऑफिस : जळगांव ( पू.खा. )

मुंबई शाखा : को–ऑपरेटिव्ह बिल्डिंग, फेरोजशा मेथा रोड.

हयातीनंतरच्या विम्यावर दर हजारीं **६०**

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its.

**YEARS OF**

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

**PUBLIC CONFIDENCE**

The following figures will convince you:

**NEW BUSINESS**

Last year 1937-38

Exceeds

Rs. 3 CRORES

**BONUS**

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs. 23 | On Whole Life Rs. 20

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches* : Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.

*Office* : throughout India & the East.

S. C. MAJUMDAR,
MANAGER : Bombay Branch.

POONA OFFICE — 180, Budhwar Peth



फर्म, कंपनी, सोसायटी

# कायदा

लेखक : श्री. के. वा. गजेंद्रगडकर, वकील, बी. ए. (ऑनर्स), एलएल्. बी.

"न्यायबोध" या कायद्याच्या मासिकांतून क्रमशः प्रसिद्ध झालेली लेखमाला आतां पुस्तकरूपानें तयार झाली. फर्म, कंपनी, सोसायटी यांच्या कायद्यासंबंधीं विवेचन या पुस्तकांत केलेलें आहे. हें विवेचन मुंबई इलाख्यांतील कायद्याला अनुसरून असल्यामुळें हें पुस्तक संग्रहीं ठेवणें अवश्य आहे. ट.ख. सह किंमत ८६ आण्यांची तिकिटें पाठवा.

मॅनेजर : सेंट्रल लॉ हाउस,
तुळशीबागरोड. : : नागपूर शहर



# विमा—जगत्

विमाविषयक प्रश्नांची सांगोपांग चर्चा करणारें मराठींतील एकमेव मासिक.

जानेवारी १९४० पासून ३ ऱ्या वर्षास सुरुवात. केव्हांहि वर्गणीदार होतां येतें.

वार्षिक वर्गणी फक्त २ रुपये

दर महिन्याच्या १५ तारखेस प्रसिद्ध होतें.
व्यवस्थापक—विमा—जगत्, पुणें २.



# N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

Raviwar Peth, Saraff Bazar,

POONA CITY.






**स्त्रियांचा आजार** म्हणजे मुख्यतः विटाळ-दोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स (आर्तवदोषारि) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे यादीवरून तयार केलेलें असून आज सतत १० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, सकाळी वमनपात, डोळे फुगणें, झोंपेस ताळ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह रु. ९ रुपये.

श्री हेल्थ कॉरिग एजन्सीज ( डि. के. १ )
२५।३।१ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.



# अर्थशास्त्र

लेखक—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ७००, किंमत ५ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५१/१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. ११७/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.